# प्रेसनोट १६/०३/२०१९

## विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर

विमानतळ पोलीस स्टेशन येथील पोलीसांनी गुन्हा रजि नं. ११६/२०१९, भा.द.वि. कलम- ३५४,३२३,५०४ मधील आरोपीला अटक करुन उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत ...

दिनांक ०९/०३/२०१९ रोजी महिला,वय ३९ वर्षे, रा.लोहगाव,पुणे यांनी विमानतळ पोलीस स्टेशन येथे हजर होवुन आरोपी सुरेश नरेश निपटपल्ली,रा.एमईएस. क्वार्टस् बर्माशेल पुणे याने दिनांक ०९/०३/२०१९ रोजी १५.३० वा चे सुमारास साठेवस्ती लोहगाव,पुणे येथे त्यांचे राहते घरी हजर असताना त्यांचे घराचे दार कोणीतरी वाजविल्याने त्यांनी दार उघडुन पाहीले असता, त्यांचे ओळखीचा इसम आरोपी नामे सुरेश नरेश निपटपल्ली हा बाहेर ऊभा होता, सदर इसमास त्यांनी दार का वाजविले ? असे विचारले असता, त्यांने मी तुमचे का दार वाजवु, असे बोलुन फिर्यादी यांना शिवीगाळ करु लागला, फिर्यादी यांनी शिवीगाळी कशाला करता असे बोलले असता, त्याचा राग मनात धरुन त्यांना हाताने मारहाण करु लागला व ते मारहाणीत खाली पडल्या असता, त्यांना पाठीमागुन येवुन बळजबरीने फिर्यादी यांचे कंबरेस दोन्ही हाताने आवळुन तिचे मनास लज्जा ऊत्पन्न होईल असे कृत्य करुन त्यांचा विनयभंग केलेची तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे रजि नं. ११६/२०१९, भा.द.वि. कलम- ३५४,३२३,५०४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. दाखल गुन्हयाचे तपासी अमंलदार पोलीस उप निरीक्षक, डी.जे. जाधव व त्यांचे दप्तरी पोलीस शिपाई किरण पडयाळ यांनी आरोपीची ठावठिकाणीची माहीत काढुन व शोध घेवुन दिनांक १२/०३/२०१९ रोजी आरोपीला ताब्यात घेवुन त्यास गुन्हयात अटक करुन सदरचा गुन्हा उघड करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर.**